# करोना संकटकाळात मदतीचा हात

## फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनचा पुढाकार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २८** - करोना, 'निसर्ग' चक्रीवादळाचा तडाखा यामुळे देशभरातील नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या संकटकाळात फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) संपूर्ण देशभर मदतीचा हात दिला. विविध स्तरांतील वंचित घटकांना, तसेच करोना योद्धयांना पाठबळ देण्याचे काम फाउंडेशनने केले. 'एमएमएफ'चा २६ वा वर्धापन दिवस (दि.२६) नुकताच झाला. यानिमित्ताने व्यवस्थापकीय विश्‍वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती दिली. 'फाउंडेशनशी जोडल्या गेलेले सहकारी, कॉर्पोरेट दाते, स्वयंसेवक व स्वयंसेवी संस्थांच्या



सहकार्यामुळे या संकटांचा सामना करणे शक्य झाले,' असे त्या म्हणाल्या.

छाब्रिया म्हणाल्या, 'रोजंदारीवरील, स्थलांतरित मजूर, प्लंबर आदी घटकांना किराणा साहित्य किट, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. 'अन्नमित्र' आणि 'विकास खन्नाज फीड इंडिया' यांच्या सहकार्याने एक लाखांपेक्षा जास्त लोकांना अन्न-धान्य दिले. तसेच पुण्यातून बाहेरगावी जाणाऱ्या १३ हजार स्थलांतरित मजुरांना चप्पल, खाद्यपदार्थ दिले. राजस्थानातील संगीत कलाकार, पुण्यातील तृतीयपंथी समाजाला रेशन देण्यात आले. कापडी मास्कच्या माध्यमातून एचआयव्हीग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून दिला.'

या काळात रुग्णालयांच्या गरजा लक्षात घेऊन देशातील अनेक रुग्णालयांत वैद्यकीय उपकरणे, सॅनिटायझर, मास्क, पीपीई किट दिले. डॉक्टर्स, नर्स यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते सर्व साहित्य फाउंडेशनने दिले आहे. वेंकिजच्या सहाय्याने एक लाख अंड्यांचे वाटप केले. निसर्ग, अम्फान चक्रीवादळासह आसाममध्ये नुकत्याच आलेल्या २० हजार पूरग्रस्तांना मदत पुरवली. पूर्व भारतात 'रंगीन खिडकी' संस्थेने सहकार्य केले.' असे छाब्रिया म्हणाल्या.